जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ५२९ दिनांक - १३/१२/२०२४

युनिट २ गुन्हे शाखा पुणे शहर

### खुना सारख्या गंभीर गुन्हयातील पाहिजे असलेला व रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार सांगली एल.सी.बी. व युनिट २ कडुन जेरबंद

दिनांक १२/१२/२०२४ रोजी तासंगाव सांगली येथील गुन्हा रजिस्टर क्रमांक ५५९/२०२४ बी. एस. एन. कलम १०३(१),१९१(३),१९०(१)१८९(२)१९१(३)१९० शस्त्र अधिनियम ४(२५),२७ अन्वये संवेदनशील खून, खूनाचा प्रयत्न सारख्या दाखल झालेल्या गंभीर गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री निखल पिंगळे व मा. पोलीस अधिक्षक सांगली श्री संदिप घुगे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पथक व सांगली एल.सी.बी पथक हे संयुक्तपणे गुन्हयातील रेकार्डवरील पाहिजे आरोपी नामे **विशाल सज्जन फाळके वय ३२ वर्ष रा.हनुमाननगर आंबेगाव खुर्द पुणे** यांचा शोध मा.वरिष्ठांच्या सुचनेनुसार गुन्हा घडले पासून माहिती काढणे चालू होते. त्याप्रमाणे दिनांक १३/१२/२०२४ रोजी सांगली येथील आलेल्या एल सी बी पथकाचे सपोनि पंकज पवार व त्यांचे पथक व गुन्हे शाखा युनिट २ प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर, सपोनि आशिष कवठेकर, पोलीस अंमलदार उज्वल मोकाशी, शंकर कुंभार, संजय जाधव, शंकर नेवसे, निखिल जाधव अशा दोन्ही टीम संयुक्तपणे काम करीत असताना नमूद आरोपी खेड शिवापूर येथे येणार असल्याचे पोलीस अंमलदार उज्वल मोकाशी यांचे बातमीवरुन सापळा रचून त्यास ताब्यात घेतले व त्यास एल.सी.बी. सांगली टिमच्या ताब्यात दिले आहे.

नमूद आरोपी हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापुर्वी तासगाव सांगली सिहंगड रोड, वारजे, बिबवेवाडी, भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे खुन, खुनाचा प्रयत्न, खंडणी व शस्त्र अधिनियम ३ (२५), ४(२५) अन्वये एकुण ०८ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे, मा.सहायक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री.गणेश इंगळे यांचे मागदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ कडील पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, सपोनि आशिष कवठेकर सपोनि अमोल रसाळ, पोलीस हवालदार उज्वल मोकाशी, शंकर कुंभार,संजय जाधव, शंकर नेवसे, निखिल जाधव, विजय पवार,नागनाथ राख, विनोद चव्हाण राहुल शिंदे अमोल सरडे, संजय आबनावे, प्रमोद कोकणे, व पुष्पेंद्र चव्हाण यांनी केली आहे.